# ज्येष्ठांकडून राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा






**मुंबई : फॅमिली वेल्फेअर एजन्सीच्या वतीने डिलाइल रोड येथे महिलांची तर धारावी येथे पुरुषांची रॅली काढण्यात आली.**

**मुंबई : प्रतिनधी**

'द फॅमिली वेल्फेअर एजन्सी' गेली ६१ वर्षे ज्येष्ठ नागरिक व मानसिक स्वास्थ या क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. भारतात ९ % ज्येष्ठ नागरिक आहेत. १६ ऑगस्ट २०१० हा दिवस राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक निषेध दिन आझाद मैदानावर साजरा झाल्यानंतर केंद्र सरकारने काही मागण्यांची दखल घेतली. परंतु राज्य सरकारने, अजून मुख्य मागण्यांचा स्वीकार व त्याची अंमलबजावणी केली नाही. त्यासाठी 'फॅमिली वेल्फेअर एजन्सी' ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने सर्व ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन सर्वसामान्य नागरिक व सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी धारावी येथे प्रभात फेरीद्वारे व १२ ऑगस्ट रोजी डिलाईल रोड येथे 'ज्येष्ठ नागरिक राष्ट्रीय एकात्मता दिवस' साजरा करण्यात आला.

यामध्ये सुमारे १०० ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग होता. यावेळी त्यांनी आपल्या मागण्या मांडल्या. त्यामध्ये राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक धोरण १९९९ जुन्या धोरणाची अंमलबजावणी केंद्र सरकारने करावी, ज्येष्ठ नागरिक राज्य धोरण २०११ मध्ये स्वीकारावे व त्याची अंमलबजावणी करावी, राज्य सरकारने आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ (पोटगी) व कल्याणविषयक कायद्याची अंमलबजावणी करावी, कोर्टामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित प्रकरणाचा निकाल लवकरात-लवकर लावावा, राष्ट्रीय आरोग्य विमा योजना अमलात आणावी, ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करताना बेस्टमध्ये सवलत मिळावी, राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक आरोग्य योजना २०११ ची अंमलबजावणी करावी, दारिद्र्यरेषेखाली असलेल्या निराधार ज्येष्ठ नागरिकांना समान पेन्शन योजना राज्यामध्ये राबवण्यात यावी, प्रत्येक जिल्हा स्तरावर व प्राथमिक आरोग्य केंद्रावर ज्येष्ठ नागरिकांसाठी बाह्य रुग्ण विभाग व वॉर्ड असावेत, प्रत्येक जिल्ह्यात ज्येष्ठांसाठी आनंदाश्रम असावेत, अशा मागण्यांचा समावेश आहे.